RNI NO - MHMAR/26/A2042

साप्ताहिक

महाविद्यालय खबरबात

MAHAVIDYALAY KHABARBAT

संस्थापक
मुख्य संपादक - डॉ. राजकुमार मा.कोल्हे

डोंबिवली,कल्याण,ठाणे,रायगड,नागपुर येथुन प्रकाशित

संपादक - डॉ.सौ.प्रेरणा राजकुमार मा.कोल्हे

■ वर्ष १ ■ अंक ७ ■ गुरुवार , २४ ते ३० सप्टेंबर २०२६ ■ किंमत ३ रुपये ■ पाने ४

जेएमएफ शिक्षण संस्थेत 'श्रीगणेश : प्राचीन ज्ञान आणि आधुनिक व्यवस्थापन' या विषयावर प्रेरणादायी परिसंवाद







डोंबिवली - जेएमएफ शिक्षण संस्थेच्या वतीने **Lord Shri Ganesha: Ancient Wisdom for Modern Management** - श्रीगणेश : प्राचीन ज्ञान आणि आधुनिक व्यवस्थापन' या विषयावर एक प्रेरणादायी व ज्ञानवर्धक परिसंवाद आयोजित करण्यात आला. या परिसंवादातून भगवान श्रीगणेशाच्या पौराणिक कथा, प्रतीके आणि त्यामागील जीवनमूल्ये यांचा आधुनिक विचार, व्यवस्थापन, नेतृत्व, निर्णयक्षमता, बुद्धिमत्ता, संयम आणि व्यक्तिमत्त्व विकासाशी असलेला संबंध विद्यार्थ्यांसमोर उलगडण्यात आला.परिसंवादाची सुरुवात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राजकुमार कोल्हे, संस्थापिका सचिव डॉ. प्रेरणा राजकुमार कोल्हे आणि खजिनदार जान्हवी कोल्हे यांच्या हस्ते श्री सरस्वती व श्री गणेश पूजनाने करण्यात आली.हिंदू धर्मपरंपरेत भगवान श्रीगणेशाला सुखकर्ता, दुःखहर्ता आणि विघ्नहर्ता मानले जाते. त्यामुळे श्रीगणेशाचे व्यक्तिमत्त्व हे केवळ धार्मिक श्रद्धेपुरते मर्यादित नसून त्यामध्ये जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेली अनेक मूल्ये आणि व्यवस्थापनाची तत्त्वे दडलेली आहेत, असे प्रतिपादन परिसंवादाचे वक्ते आणि संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राजकुमार कोल्हे यांनी केले.'लहानांपासून थोरांपर्यंत प्रत्येकाच्या मनातला आणि कल्पनेतला गणपती वेगळा असतो; मात्र प्रत्येकासाठी गणपती हा बुद्धीचा दाता आहे,' असे सांगत डॉ. कोल्हे यांनी गणेशाच्या विविध प्रतीकांचा अर्थ विद्यार्थ्यांना समजावून सांगितला.

भगवान गणेशाच्या गजानन स्वरूपामागील पौराणिक कथेकडे आधुनिक दृष्टिकोनातून पाहताना त्यांनी मानवी शरीर आणि निसर्गाने प्रदान केलेले हत्तीचे मस्तक या संगमाचे प्रतीकात्मक महत्त्व स्पष्ट केले. हत्ती हा सामर्थ्य, स्मरणशक्ती आणि बुद्धिमत्तेचे प्रतीक मानला जातो. त्यामुळे गणेशाच्या स्वरूपातून शक्तीबरोबर बुद्धी, ज्ञानाबरोबर विवेक आणि अधिकाराबरोबर जबाबदारी यांचा संदेश मिळतो, असे त्यांनी स्पष्ट केले.'सनातन ज्ञान म्हणजे अनुभवातून मिळालेले ज्ञान आणि त्या ज्ञानाचा योग्य वेळी, योग्य प्रकारे वापर करून योग्य निर्णय घेणे म्हणजे शहाणपण किंवा बुद्धी,' असे डॉ. राजकुमार कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.आजच्या आधुनिक व्यवस्थापनामध्ये केवळ ज्ञान असणे पुरेसे नसून त्या ज्ञानाचा योग्य परिस्थितीत योग्य उपयोग करण्याची क्षमता आवश्यक असते. श्रीगणेशाच्या विविध प्रतीकांमधून निर्णयक्षमता, समस्या सोडविण्याची वृत्ती, संयम, एकाग्रता, ऐकण्याची क्षमता, नम्रता आणि नेतृत्वगुण यांसारखी आधुनिक व्यवस्थापनाची तत्त्वे शिकता येतात, असे त्यांनी सांगितले.

गणेशाच्या मोठ्या कानांमधून अधिक ऐकण्याचा, छोट्या डोळ्यांमधून एकाग्रतेचा, मोठ्या मस्तकातून विस्तृत विचारांचा, सोंडेच्या लवचिकतेतून परिस्थितीनुसार बदल स्वीकारण्याचा, तर उंदराच्या वाहनातून इच्छा आणि अहंकारावर नियंत्रण ठेवण्याचा संदेश मिळतो, अशा विविध प्रतीकात्मक अर्थांची त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत चर्चा केली.परिसंवादामध्ये भगवान श्रीगणेशाशी संबंधित विविध पौराणिक कथांचा संदर्भ देत त्यामागील जीवनमूल्ये आणि आधुनिक संदर्भ विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आले.गणेशाने अंतासुराचा वध करून त्याला गिळंकृत केल्यानंतर शरीरामध्ये निर्माण झालेला दाह कमी करण्यासाठी दुर्वांचा उपयोग झाल्याची कथा सांगताना निसगार्तील प्रत्येक घटकाचे स्वतःचे महत्त्व असते आणि भारतीय परंपरेमध्ये निसर्ग, आरोग्य आणि अध्यात्म यांचा परस्परसंबंध अधोरेखित केला आहे, असे डॉ. कोल्हे यांनी स्पष्ट केले.यातून विद्यार्थ्यांना आपल्या प्राचीन कथांकडे केवळ कथा म्हणून न पाहता त्यातील प्रतीकात्मक, नैतिक आणि जीवनोपयोगी संदेश समजून घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

परिसंवादादरम्यान भगवान श्रीगणेशाशी संबंधित चित्रफितही दाखविण्यात आली, ज्यामुळे विद्यार्थ्यांना विषय अधिक प्रभावीपणे समजून घेता आला.या परिसंवादामध्ये जन गण मन इंग्रजी माध्यमिक शाळा, जन गण मन विद्यामंदिर आणि वंदे मातरम् महाविद्यालयातील सुमारे 300 विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते. त्याचबरोबर संस्थेतील शिक्षकवगार्नेही परिसंवादाचा लाभ घेतला.विद्यार्थ्यांनी विषयाशी संबंधित विविध पैलू जाणून घेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरा आणि आधुनिक जीवनपद्धती यांच्यामधील संबंध समजून घेण्याची संधी या परिसंवादामुळे विद्यार्थ्यांना मिळाली.

परिसंवादाच्या समारोपप्रसंगी डॉ. राजकुमार कोल्हे यांनी भगवान श्रीगणेशाच्या भक्तीचा आणि जीवनमूल्यांचा संदेश देताना म्हटले—'यत्र तत्र सर्वत्र असे बाप्पाचा वास, श्रद्धेने धरावी भक्तीची कास.'श्रद्धा ही केवळ धार्मिक भावना नसून ती सकारात्मक विचार, आत्मविश्वास, सद्वर्तन आणि योग्य कृतीची प्रेरणा देणारी शक्ती ठरू शकते, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.पौराणिक कथांमधून प्राचीन भारतीय विचारप्रणाली समजून घेताना त्यातील जीवनोपयोगी तत्त्वे आधुनिक जीवनात कशी आचरणात आणता येतील, याचे अनेक पैलू डॉ. राजकुमार कोल्हे यांनी आपल्या ओघवत्या आणि संवादात्मक शैलीत विद्यार्थ्यांसमोर मांडले.परिसंवादाच्या शेवटी 'देवा श्रीगणेशा'च्या भक्तिमय नादाने संपूर्ण वातावरण मंगलमय झाले आणि उपस्थितांच्या पावलांनी आनंदाने ठेका धरला. ज्ञान, अध्यात्म, संस्कृती आणि आधुनिक व्यवस्थापन यांचा सुंदर संगम घडविणारा हा परिसंवाद विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव कार्यशाळा संपन्न.....

डोंबिवली (प्रतिनिधी) - जे.एम.एफ.च्या वंदे मातरम् कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता बी.एस्सी. विज्ञान विद्याशाखेच्या जीवशास्त्र विभागातर्फे विज्ञान प्रयोगशाळेत कार्यशाळा झाली.

या कार्यशाळेत 'पर्यावरणपूरक गणेशोत्सव (मूर्ती बनवणे कार्यशाळा) व कागद निर्मिती उपक्रम' ही कार्यशाळा डोंबिवली येथील 'पर्यावरण दक्षता मंडळा'द्वारे या महाविद्यालयातील विज्ञान शाखेच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेचे नियोजित विभागप्रमुख प्रा. मृणाली जाधव व प्रभारी प्रा. डॉ. रागिनी श्रीमाळी यांनी केले होती.





विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्याचे कौशल्य आत्मसात केले.

त्यांनी तयार केलेल्या मूर्ती जे.एम.एफ. ट्रस्टचे माननीय संस्थापक अध्यक्ष डॉ. राजकुमार कोल्हे यांना भेट म्हणून दिले.

या उपक्रमातून पर्यावरण संवर्धन व सृजनशीलतेचा संदेश देण्यात आला.विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला व कार्यशाळेचा लाभ घेतला.महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.सहाय्यक प्राध्यापक गिरीश लक्ष्मीदास छगाणि जेएमएफचे वंदे मातरम् कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, कोपर, जुनी डोंबिवली.

संपादकीय

गणेशोत्सव भक्तीचा की दिखाव्याचा?

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. श्रीगणेश म्हणजे बुद्धी, विवेक, मंगलकार्य आणि विघ्नहत्यार्चे प्रतीक. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला सामाजिक एकजुटीचे आणि जनजागृतीचे स्वरूप दिले. त्यामुळे या उत्सवामागे केवळ धार्मिक भावना नसून समाजप्रबोधनाची मोठी परंपरा आहे.

मात्र आजच्या काळात या उत्सवाचे बदलते स्वरूप विचार करायला भाग पाडते. मोठमोठी मंडळे, भव्य सजावट, रस्ते अडवून उभारले जाणारे मंडप आणि वाढता ध्वनिप्रदूषणाचा गोंगाट यामुळे गणेशोत्सवाच्या मूळ उद्देशालाच कुठेतरी तडा जाताना दिसतो.

गणेशमूर्ती आणि मंडपांसाठी सार्वजनिक रस्त्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. परिणामी वाहतुकीची कोंडी होते, रुग्णवाहिका, अग्निशमन वाहने किंवा अत्यावश्यक सेवांना अडथळा निर्माण होऊ शकतो. ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, विद्यार्थी, कामगार आणि रोज प्रवास करणाऱ्या सामान्य नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागतो.

डॉ. प्रेरणा राजकुमार कोल्हे
संपादक

देवाच्या स्वागतासाठी उभारलेला मंडप जर दुसऱ्या माणसाच्या वाटेतील अडथळा ठरत असेल, तर आपण उत्सवाच्या भावनेचा पुनर्विचार करण्याची गरज आहे.

दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे गोंगाट. भक्तीच्या नावाखाली मोठ्या आवाजात संगीत, डीजे आणि ध्वनिवर्धकांचा वापर वाढताना दिसतो. काही ठिकाणी रात्री उशिरापर्यंत सुरू राहणारा आवाज विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर, वृद्धांच्या विश्रांतीवर, रुग्णांच्या आरोग्यावर आणि सर्वसामान्यांच्या शांततेवर परिणाम करतो. भक्ती ही मनाला शांत करणारी असावी; ती इतरांच्या शांततेचा भंग करणारी नसावी.

गणेशोत्सवाची खरी स्पर्धा मंडप किती मोठा, सजावट किती महागडी किंवा आवाज किती मोठा यामध्ये नसावी. त्याऐवजी कोणते मंडळ रक्तदान शिबिर घेते, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करते, पर्यावरणाचे रक्षण करते, आरोग्य शिबिर आयोजित करते, व्यसनमुक्तीचा संदेश देते किंवा समाजात बंधुभाव निर्माण करते—याची स्पर्धा व्हावी.

'उत्सव मोठा असावा; पण त्यापेक्षा माणुसकी मोठी असावी.'

श्रीगणेशाला प्रिय असलेली बुद्धी आणि विवेक आपण आपल्या उत्सवात उतरवू या. रस्ते शक्य तितके मोकळे ठेवू या, ध्वनिप्रदूषणाला मर्यादा घालू या, पर्यावरणपूरक उत्सव साजरा करू या आणि गणेशोत्सवाला पुन्हा भक्ती, संस्कृती, सामाजिक बांधिलकी आणि जनजागृतीचा उत्सव बनवू या.

गणपती बाप्पा मोरया!
मंगलमूर्ती मोरया!

प्राथमिक शाळांमध्ये ८१८ शिक्षकांची भरती रुजू होण्यासाठी महिनाभराचा कालावधी

पालघर : पालघर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत 'पवित्र पोर्टल भरती २०२५' प्रक्रियेला गती मिळाली असून कागदपत्रांच्या पडताळणीची फेरी पार पडली असून पवित्र पोर्टलवर दर्शवलेल्या १३३० पदांपैकी जेमतेम ८१८ उमेदवार कागदपत्र पडताळणीनंतर पात्र ठरले आहेत. पात्र ठरलेल्या शिक्षकांची समुपदेशन प्रक्रिया पूर्ण झाली असून या शिक्षकांना पुढील महिन्याभरात नेमून दिलेल्या शाळांच्या ठिकाणी हजर होण्यासाठी अवधी देण्यात आला आहे.



जिल्हा परिषदेच्या मराठी आणि उर्दू माध्यमांच्या प्राथमिक शाळांमध्ये मोठ्या प्रमाणावर रिक्त असलेल्या जागा भरण्यासाठी ही प्रक्रिया राबवली जात आहे.



जे एम एफ शिक्षण संस्थेमध्ये रंगला संस्कार संस्कृतीचा अवीट संगम सरजा राजा बैलपोळा उत्सव.....

डोंबिवली (प्रतिनिधी) - विद्यार्थ्यांना आपल्या महाराष्ट्राची संस्कृती, सण वार याबाबत माहिती असणे गरजेचे आहे , हा कटाक्ष कायमच जे एम एफ संस्था सर्व कार्यक्रमांच्या माध्यमातून राबवित असते.

बैलपोळा हा सण खेड्यापाड्यातून मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो, आमच्याही जे एम एफ शिक्षण संस्थेमध्ये बैलपोळा सण मोठ्या उत्साहात साजरा केला गेला. शिशु विहार ते इयत्ता दुसरी पर्यंतचे सर्वच विद्यार्थी ,विद्यार्थिनी शेतकरी वेष परिधान करून सोबतच बैलजोडी , पूजेचे तबक घेऊन आले होते .

ह्या सोहळ्याचे विशेष आकर्षण होते ते म्हणजे खरीखुरी बैलगाडी , आणि ती बैलगाडी बघून मुलांचा आनंद गगनात मावेना .संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ राजकुमार कोल्हे आणि संस्थापिका सचिव डॉ प्रेरणा कोल्हे, व शेतकरी विद्यार्थी विद्यार्थिनींनी शाळेच्या प्रवेशद्वाराजवळच बैलगाडी आणि बैलजोडीची पूजा अर्चा केली आणि वाजत गाजत जे एम एफ ब्रह्मा रंगातलयाच्या प्रांगणात बैलगाडीचे आगमन झाले.उपस्थित सर्व मुलांनी बैलगाडी बघून आनंदाने एकच जल्लोष केला.

शेतकरी हा आपला अन्नदाता आहे तर बैल आपला सखा आहे, ३६४ दिवस बैल शेतामध्ये अविरत पणे नांगरणी





करत असतात म्हणुनच त्यांना वषार्तून एक दिवस सक्तीचा आराम बैलपोळा दिवशीच मिळतो, तुम्हा मुलांचा देखील वाढदिवस असतो त्यादिवशी तुमचेही लाड केले जातात, कौतुक होते तसेच आजच्या दिवशी बैलांचा वाढदिवसच आहे असे मानून त्यांचे व त्यांच्या कामाचे कौतुक करून कृतज्ञता व्यक्त केली जाते.असे संस्थापक अध्यक्ष डॉ राजकुमार कोल्हे यांनी मुलांना सांगितले व शुभेच्छा दिल्या.

आजच्या दिवशी बैलांना गोडधोड पदार्थ करून खाऊ घातले जातात तर पुरणपोळी हा तर आपला महाराष्ट्रीय खास पदार्थ घराघरांतून बैलांना नैवेद्यासाठी बनवला जातो , असे सचिव डॉ प्रेरणा कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना बैलपोळ्या ची माहिती देताना सांगितले.

सर्व मुलांनी पुरणपोळी घरातून बनवून आणली होती व सर्वांनी बैलांना खाऊ घातली.

सर्व मुलांचे खास आकर्षण होते ते म्हणजे रंगबेरंगी , पाठीवर मखमली झुल टाकलेली बैलजोडी आणि बैलगाडी..सर्व मुलांनी (सरजा राजा) बैलगाडी मध्ये बसून फेरफटका मारला , तसेच सर्व शिक्षकांनी उस्फूर्तपणे सहभाग दर्शवून बैलपोळा सण आनंदाने साजरा केला.

जेएमएफच्या सचिव सौ. प्रेरणा राजकुमार कोल्हे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

सामाजिक बांधिलकी, शैक्षणिक कार्य आणि सेवाभावी वृत्तीचा गौरव

डोंबिवली, २३ सप्टेंबर २०२६ :जाह्नविज मल्टी फाउंडेशनच्या सचिव सौ. प्रेरणा राजकुमार कोल्हे यांचा वाढदिवस जेएमएफ परिवाराच्या वतीने उत्साहपूर्ण, आपुलकीच्या आणि आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. शिक्षण, संस्कार, सामाजिक बांधिलकी आणि सेवाभावी उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन देणाऱ्या सौ. प्रेरणा कोल्हे यांच्या कार्याचा यावेळी गौरव करण्यात आला.

जाह्नविज मल्टी फाउंडेशनच्या विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांच्या वाटचालीत सौ. प्रेरणा कोल्हे यांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. संस्थेच्या दैनंदिन कार्यात व्यवस्थापनाला सहकार्य करण्याबरोबरच विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि जेएमएफ परिवाराशी आत्मीयतेने संवाद साधत त्या संस्थेच्या विकासासाठी सातत्याने कार्यरत आहेत.

वाढदिवसानिमित्त जेएमएफ परिवारातील पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि हितचिंतकांनी सौ. प्रेरणा कोल्हे यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी, दीर्घायुष्यासाठी आणि पुढील सामाजिक व शैक्षणिक कार्यासाठी सर्वांनी शुभेच्छा व्यक्त केल्या.







शिक्षण आणि संस्कारांच्या कार्यात मोलाची साथ

जाह्नविज मल्टी फाउंडेशनच्या माध्यमातून विविध शैक्षणिक संस्था, सामाजिक उपक्रम आणि विद्यार्थी-केंद्रित कार्यक्रम राबविले जात आहेत. या सर्व उपक्रमांमध्ये संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राजकुमार कोल्हे यांच्या संकल्पनांना सौ. प्रेरणा कोल्हे यांची सातत्यपूर्ण साथ लाभत आहे.

विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान न देता त्यांच्यामध्ये संस्कार, जीवनमूल्ये, आत्मविश्वास, सामाजिक जाणीव आणि सकारात्मक विचारसरणी विकसित व्हावी, यासाठी संस्थेच्या विविध उपक्रमांना त्या प्रोत्साहन देतात.

जेएमएफ परिवाराच्या विविध धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सामाजिक कार्यक्रमांमध्ये त्यांचा उत्स्फूर्त सहभाग असतो. त्यामुळे त्या संस्थेच्या व्यवस्थापनातील जबाबदार व्यक्तीबरोबरच अनेकांसाठी मातृवत आणि आपुलकीचे व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित आहेत.

डॉ. राजकुमार कोल्हे यांनी व्यक्त केला स्नेह

यावेळी संस्थापक अध्यक्ष डॉ. राजकुमार कोल्हे यांनी सौ. प्रेरणा कोल्हे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना त्यांच्या जीवनातील सहकार्य, समर्पण आणि संस्थेच्या कार्यातील योगदानाचा उल्लेख केला.

जेएमएफ शिक्षण संस्थेत भक्तिमय सुंदरकांड पठण आणि मानसिक स्वास्थ्य जागरूकता परिसंवाद संपन्न....

डोंबिवली - कोपर (प्रतिनिधी) - गणेशोत्सवानिमित्त धार्मिक संस्कार आणि मानसिक स्वास्थ्याचा सुंदर संगम

गणपती बाप्पाच्या आगमनाने वातावरणात भक्ती, श्रद्धा आणि सकारात्मक ऊर्जेचा संचार होतो. याच भावनेतून जेएमएफ शिक्षण संस्थेच्या परिसरात १२ दिवस विराजमान असलेल्या श्री गणेशमूर्तीसमोर सुंदरकांड पठण आणि मानसिक स्वास्थ्य जागरूकता परिसंवादाचे आयोजन करण्यात आले.धार्मिक श्रद्धेबरोबरच विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याला महत्त्व देणारा हा उपक्रम अत्यंत भावपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

भक्तिमय वातावरणात सुंदरकांड पठण

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात प्रोफेसर शुभम श्रीवास्तव यांनी आपल्या ओजस्वी आणि शुद्ध वाणीमध्ये सुंदरकांडाचे पठण केले. सुंदरकांडाच्या माध्यमातून त्यांनी प्रभू श्रीराम आणि भक्त हनुमान यांच्यातील अतूट भक्ती, श्रद्धा, समर्पण, धैर्य आणि सेवाभाव यांचे प्रभावी वर्णन केले.

प्राध्यापिका खुशबू मॅडम यांनीही सुंदरकांड पठणामध्ये त्यांना भक्तिभावाने साथ दिली. टाळ, झांज आणि तबला या पारंपरिक वाद्यांच्या साथीने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. श्रीराम आणि हनुमानाच्या भक्तीमय वातावरणात उपस्थित विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी आणि भक्तगण मंत्रमुग्ध होऊन सुंदरकांड ऐकत होते. सुंदरकांडातील हनुमानजींचे धैर्य, आत्मविश्वास, निष्ठा आणि संकटांवर मात करण्याची वृत्ती विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरली. श्रद्धा, सकारात्मक विचार, आत्मविश्वास आणि प्रयत्न यांच्या बळावर कोणत्याही अडचणीवर मात करता येते, हा संदेश या भक्तिमय उपक्रमातून अधोरेखित झाला.

श्री गणेश, श्रीराम आणि हनुमानाची आरती

सुंदरकांड पठणानंतर जेएमएफचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राजकुमार कोल्हे, सचिव







डॉ. प्रेरणा कोल्हे, निवृत्त मुख्याध्यापक परशुरामजी भांगे आणि सौ. पुष्पा भांगे यांच्या हस्ते श्री गणपती बाप्पा तसेच श्रीराम-हनुमानाची आरती करण्यात आली.

आरतीच्या वेळी उपस्थित सर्वांनी भक्तिभावाने सहभाग घेतला. संपूर्ण परिसरात 'श्री गणेशाय नमः', 'जय श्रीराम' आणि 'जय हनुमान'च्या जयघोषाने भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

दुसऱ्या सत्रात मानसिक स्वास्थ्य जागरूकता परिसंवाद

धार्मिक कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा विचार करून 'मानसिक स्वास्थ्य जागरूकता' या महत्त्वपूर्ण विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले.जेएमएफच्या मधुबन वातानुकूलित दालनात आयोजित या परिसंवादाला सुमारे २०० विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते.

या परिसंवादासाठी भाभा अणुसंशोधन केंद्राचे माजी अध्यक्ष श्री. बी. के. जैन हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना आजच्या स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण जीवनात मानसिक स्वास्थ्याचे महत्त्व अत्यंत सोप्या आणि प्रभावी पद्धतीने स्पष्ट केले.

मानसिक स्वास्थ्यासाठी योग, प्राणायाम आणि व्यायाम आवश्यक

श्री. बी. के. जैन यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, मानसिक स्वास्थ्य टिकवण्यासाठी मन आणि शरीर यांच्यात संतुलन असणे अत्यंत आवश्यक आहे. नियमित योगाभ्यास, प्राणायाम, व्यायाम आणि ध्यानधारणा यामुळे मन शांत राहण्यास आणि एकाग्रता वाढण्यास मदत होते.एकाग्रता वाढविण्यासाठी भ्रामरी प्राणायामाचा सराव उपयुक्त ठरतो, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच आपल्या आरोग्याकडेही लक्ष द्यावे, असा त्यांनी विशेष आग्रह धरला.ते म्हणाले की, इतर अनेक गोष्टींसाठी आपण वेळ देतो; परंतु स्वतःसाठीही दररोज थोडा वेळ राखून ठेवणे आवश्यक आहे. स्वतःशी संवाद साधणे, मन शांत ठेवणे आणि आपल्या विचारांकडे लक्ष देणे ही मानसिक स्वास्थ्याची महत्त्वाची पावले आहेत.

जेएमएफच्या वंदे मातरम् महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा....

डोंबिवली (प्रतिनिधी) - डोंबिवली-कोपर येथील जेएमएफच्या वंदे मातरम् कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सोमवार, दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करून हा दिवस विशेष पद्धतीने साजरा केला.

या निमित्ताने विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळत विविध भूमिका प्रभावीपणे पार पाडल्या. तृतीय वर्ष बी. एस्सी.चे शिवश्याम यादव यांनी अध्यक्षपदाची, तर प्रगती पांडे यांनी सचिवपदाची भूमिका बजावली.तृतीय वर्ष बी.एस्सी.च्या नीताबा आर. यांनी प्राचार्यपदाची भूमिका साकारली, तर द्वितीय वर्ष बी. एस्सी.च्या प्रज्ञा सिंह यांनी रसायनशास्त्र विभागप्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडली.साहिल राजभर यांनी



प्राणीशास्त्र विभागाची भूमिका साकारून विजेतेपद मिळविले, तर आदित्यराज सिंह यांनी वनस्पतिशास्त्र विभागाची भूमिका साकारली.सत्यम राय यांनी व्ही.एस.सी.ची, तर सलोनी बोले यांनी रसायनशास्त्र विभागाची भूमिका उत्साहाने पार पाडली.तृतीय वर्ष संगणकशास्त्राचे यश मसरकर व तृतीय वर्ष माहिती तंत्रज्ञानच्या प्रगती अंधाळे यांनी सहाय्यक प्राध्यापकांची भूमिका साकारली.तृतीय वर्ष वाणिज्यच्या मानसी मिश्रा व प्रा. कॉम.चे मितेश पाटील यांनीही सहाय्यक प्राध्यापक म्हणून जबाबदारी स्वीकारली.

तृतीय वर्ष बी.एफ.एम.चे विग्नेश शेषाद्री कुचिन यांनी ग्रंथपालाची भूमिका साकारून सहभाग नोंदविला.या सर्व विद्यार्थ्यांचा जेएमएफ ट्रस्टचे माननीय संस्थापक अध्यक्ष डॉ. राजकुमार कोल्हे मा. उपस्थितीत. सचिव डॉ.प्रेरणा आर.कोल्हे तसेच व ज्येष्ठ शिक्षकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त करत शिक्षकांच्या कार्याचा गौरव केला.

शिक्षक दिनानिमित्त झालेल्या या अभिनव उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या जबाबदाऱ्या व महत्त्व जवळून अनुभवता आले. विद्यार्थी व शिक्षकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण कार्यक्रम आनंददायी, प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला.

जे.एम.एफ.च्या वंदे मातरम् महाविद्यालयात ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा

डोंबिवली : जे.एम.एफ.च्या वंदे मातरम् कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स, ओल्ड डोंबिवली (पश्चिम), कोपर येथे 12 ऑगस्ट रोजी ग्रंथपाल दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे आयोजन वाणिज्य विभाग, ग्रंथपाल रविंद्र शिंदे व ग्रंथालय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामचंद्र एन. नाडार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपप्राचार्या डॉ. वनिता लोखंडे, कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील सहाय्यक प्राध्यापक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. रामचंद्र एन. नाडार यांनी ग्रंथालयशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या महान



कार्याचा परिचय करून दिला. डॉ. रंगनाथन यांचा जन्म 12 ऑगस्ट 1892 रोजी झाला असून त्यांच्या जन्मदिनी भारतात राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा केला जातो. त्यांनी भारतातील ग्रंथालय चळवळीला शास्त्रीय व आधुनिक दिशा दिली. त्यांनी प्रसिद्ध केलेली ग्रंथालयाची पाच तत्त्वे आजही ग्रंथालय व्यवस्थापनासाठी मार्गदर्शक मानली जातात. **Books are for use** या विचारातून त्यांनी ग्रंथालय हे केवळ पुस्तके साठविण्याचे ठिकाण नसून ज्ञान सर्वांसाठी उपलब्ध करून देणारे केंद्र असावे, हा संदेश दिला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व बौद्धिक विकासामध्ये ग्रंथालयाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण करण्यास तसेच ग्रंथालयाचा अधिकाधिक उपयोग करण्यास प्रेरणा मिळाली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रंथपाल रविंद्र शिंदे, ग्रंथालय समिती तसेच वाणिज्य विभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी विशेष सहकार्य केले. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमातून वाचनसंस्कृती आणि ज्ञानार्जनाचे महत्त्व अधोरेखित झाले.

महाराष्ट्रात अल्पसंख्यांक कोट्यात किती प्रवेश? आरोग्य विद्यापीठाची छाननी

नाशिक - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी संलग्न राज्यातील अल्पसंख्यांक दर्जाप्राप्त शिक्षण संस्थांमार्फत अल्पसंख्यांक समुदायातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात किती प्रमाणात प्रवेश दिला जातो, याची छाननी सुरू करण्यात आली आहे. धार्मिक किंवा भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांकडे मागील तीन शैक्षणिक वर्षांतील अल्पसंख्यांक



समुदायातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची माहिती मागविण्यात आली आहे.

धार्मिक अथवा भाषिक अल्पसंख्यांकांना शैक्षणिक संस्था स्थापन करून त्यांचे प्रशासन करण्याचा घटनात्मक अधिकार आहे. या अधिकाराचा मूलभूत हेतू संबंधित अल्पसंख्यांक समुदायाच्या शैक्षणिक हितांचे संरक्षण व संवर्धन करणे हा आहे. तथापि, अशा संस्थांनी प्रवेश प्रक्रिया पारदर्शक व गुणवत्ताधिष्ठित ठेवून संबंधित सक्षम प्रवेश प्राधिकरण, महाराष्ट्र शासन आणि विद्यापीठाने विहित केलेल्या पात्रता, प्रवेश क्षमता, कोटा, मंजुरी आणि शैक्षणिक मानकांचे संपूर्ण पालन करणे आवश्यक असल्याकडे विद्यापीठाने लक्ष वेधले आहे.

शासन निर्णयानुसार उच्च, तांत्रिक अथवा व्यावसायिक शैक्षणिक संस्थांच्या प्रवेशासंबंधी विविध अटी आहेत. विद्यापीठाकडे नवीन महाविद्यालय सुरू करणे, प्रवेश क्षमता वाढविणे अथवा बृहत आराखड्याशी संबंधित सवलतीसाठी प्रस्ताव प्राप्त होतात. या प्रस्तावांची छाननी करण्यासाठी अल्पसंख्यांक दर्जाप्राप्त संस्थांनी मागील तीन वर्षांत अल्पसंख्यांक समुदायातील किती विद्यार्थ्यांना प्रवेश दिला, याची माहिती विद्यापीठाकडे असणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.



भारत आणि महाराष्ट्रातील उच्च शिक्षण आणि कॉलेज क्षेत्रातील सध्याच्या सर्वात महत्त्वाच्या घडामोडी खालीलप्रमाणे आहेत....

मुंबई - प्रवेश प्रक्रिया आणि परीक्षा अपडेट्स CAT 2026: भारतीय व्यवस्थापन संस्था द्वारे घेतल्या जाणाऱ्या 'कॅट' परीक्षेची अर्ज प्रक्रिया २२ सप्टेंबर रोजी संपली असून आता विद्यार्थी प्रवेशपत्राच्या प्रतीक्षेत आहेत. ठएएळ 2026 : वैद्यकीय प्रवेशासाठीच्या 'नीट' कौन्सिलिंगच्या तिसऱ्या फेरीची नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. तसेच नॅशनल मेडिकल कमिशनने देशात वैद्यकीय शिक्षणासाठी १३,००० पेक्षा जास्त नवीन MBBS जागा वाढवल्या आहेत.MH SET 2026: सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाराष्ट्र राज्य पात्रता परीक्षा पुन्हा एकदा पुढे ढकलली असून, आता ही परीक्षा २५ ऑक्टोबर २०२६ रोजी घेतली जाईल.ळळळ प्रवेश व अभ्यासक्रम: आयआयटी कानपूरने शालेय शिक्षकांसाठी डिजिटल कौशल्य वाढवणारा विशेष उपक्रम सुरू केला आहे. तर आयआयटी खरगपूरने २०२६-२७ शैक्षणिक वर्षासाठी संस्कृतमधील विशेष सर्टिफिकेट आणि डिप्लोमा कोर्सेस खुले केले आहेत.शैक्षणिक धोरण आणि विद्यापीठ नियमव GC चे नवे नियम : विद्यापीठ अनुदान आयोगाने सर्व उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये भेदभाव रोखण्यासाठी आणि सर्वसमावेशकते ला प्रोत्साहन देण्यासाठी 'समानता समिती' स्थापन करण्याचे बंधनकारक केले आहे.मल्टीपल एंट्री-एग्झिट : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत आता विद्यार्थ्यांना कॉलेज अर्धवट सोडावे लागल्यास त्यांचे वर्ष वाया जाणार नाही. कोणत्याही टप्प्यावर शिक्षण सोडल्यास सर्टिफिकेट किंवा डिप्लोमा दिला जाईल आणि पुन्हा शिक्षण सुरू करण्याची लवचिकता मिळेल.फर्जी युनिव्हर्सिटी अलर्ट: यूजीसीने देशातील २९ बोगस आणि काळ्या यादीत टाकलेल्या विद्यापीठांची यादी जारी केली असून विद्यार्थ्यांनी अशा संस्थांमध्ये प्रवेश न घेण्याचे आवाहन केले आहे.

जे.एम.एफ.च्या वंदे मातरम् महाविद्यालयात 'उगमस्थानी कर कपात व कर संकलन अनुपालन' या अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे उद्घाटन....

डोंबिवली (प्रतिनिधी) - जे.एम. एफ.च्या वंदे मातरम् कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, जुनी डोंबिवली, कोपर

येथे दिनांक २६ ऑगस्ट २०२६ रोजी 'आयकर अधिनियम २०२५ नुसार उगमस्थानी कर कपात व उगमस्थानी कर संकलनाचे अनुपालन' या अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.

या अभ्यासक्रमाचे उद्घाटन जान्हवीज मल्टी फाउंडेशन चे माननीय संस्थापक-अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामचंद्र एन. नाडार यांच्या हस्ते झाले. यावेळी









त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उद्योगक्षेत्राच्या गरजांशी निगडित अशा कौशल्याधारित अभ्यासक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

आजच्या स्पर्धात्मक रोजगारविश्वात केवळ पुस्तकी व सैद्धांतिक ज्ञान पुरेसे नसून, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामकाजाचे आणि व्यावहारिक ज्ञान असणे अत्यंत आवश्यक आहे. अशा उद्योगसंलग्न अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढण्यास तसेच सैद्धांतिक आणि व्यावहारिक ज्ञानातील दरी कमी करण्यास मोठी मदत होते, असे प्राचार्य डॉ. नाडार यांनी स्पष्ट केले.

या अभ्यासक्रमाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तो विद्यार्थ्यांना अनुदानित व परवडणाऱ्या शुल्कात उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे आर्थिक परिस्थिती कोणतीही असली तरी विविध सामाजिक व आर्थिक स्तरांतील विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमाचा लाभ घेता येणार आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या नियमित पदवी शिक्षणासोबत अतिरिक्त व्यावसायिक कौशल्य आत्मसात करण्याची ही एक महत्त्वपूर्ण संधी आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये कौशल्याधारित, अनुभवाधारित, व्यावसायिक आणि रोजगाराभिमुख शिक्षणाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. त्या अनुषंगाने अशा अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या पदवी अभ्यासक्रमासोबत अतिरिक्त कौशल्य, व्यावहारिक अनुभव आणि प्रमाणपत्र प्राप्त करण्याची संधी मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास तसेच भविष्यातील रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधींसाठी ते अधिक सक्षम होण्यास मदत होते.

उगमस्थानी कर कपात व कर संकलनाच्या अनुपालनाशी संबंधित ज्ञान विद्यार्थ्यांना लेखाशास्त्र, वित्तव्यवस्था, करव्यवस्था, लेखापरीक्षण, उद्योग व विविध व्यावसायिक क्षेत्रांमध्ये उपयुक्त ठरणार आहे. बदलत्या करव्यवस्थेची माहिती आणि प्रत्यक्ष अनुपालन प्रक्रियेचे ज्ञान विद्यार्थ्यांना भविष्यातील कार्यक्षेत्रासाठी अधिक सक्षम बनविणार आहे.

या अभ्यासक्रमाचे समन्वयक प्रा. गिरीश एल. छगाणी यांनी उपस्थितांना अभ्यासक्रमाची सविस्तर माहिती दिली. एकूण ३० तासांच्या या अभ्यासक्रमात सैद्धांतिक ज्ञानासोबत प्रत्यक्ष व व्यावहारिक प्रशिक्षणावर विशेष भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. कर कपात व कर संकलनाच्या संकल्पना, संबंधित कायदेशीर तरतुदी, गणना पद्धती, आवश्यक कागदपत्रे, अनुपालन प्रक्रिया तसेच प्रत्यक्ष उदाहरणांच्या आधारे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे.

अभ्यासक्रमाची उपयुक्तता, व्यावहारिक स्वरूप आणि भविष्यातील रोजगाराच्या दृष्टीने असलेले महत्त्व विद्यार्थ्यांना समजल्यामुळे उपस्थित विद्यार्थ्यांमध्ये या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्याबाबत आत्मविश्वास व उत्साह निर्माण झाला. विद्यार्थ्यांना अद्ययावत करज्ञान व व्यावहारिक कौशल्य प्रदान करून त्यांना उद्योगक्षेत्रासाठी अधिक सक्षम बनविण्याच्या महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

आदित्य मोटेगावकरला थेट परीक्षेला बसण्यास बंदी.....

मुंबई (प्रतिनिधी) -आदित्य मोटेगावकरला दोन वर्षांसाठी नीट परीक्षेला बसण्यास बंदी घालण्यात आली आहे. एनटीएने आदित्य मोटेगावकरची नीट यूजी 2026 मधील उमेदवारीच रद्द केली आहे. वैद्यकीय प्रवेशाच्या तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही एक धक्कादायक बातमी आहे, ज्यामुळे परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकतेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या प्रकरणाशी संबंधित आदित्य मोटेगावकर याचे वडील शिवराज मोटेगावकर सध्या केंद्रीय अन्वेषण विभागाच्या कोठडीत आहेत. मुंबई उच्च न्यायालयाने एनटीएला या प्रकरणावर अंतिम निर्णय घेण्याचे निर्देश दिले होते. त्या निर्देशानुसार, एनटीएने आदित्य मोटेगावकरला अधिकृत पत्र पाठवून ही बंदी घातली आहे.

हा निर्णय वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील संभाव्य गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठी महत्त्वपूर्ण मानला जात आहे. एनटीएच्या या कठोर भूमिकेमुळे भविष्यातील परीक्षांमध्ये अधिक विश्वासार्हता येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे, तसेच अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एक कठोर संदेश दिला गेला आहे.

उलट असल्या राजकारण्यांना त्यांची लायकी दाखवावी.. साहिलच्या मृत्यूनंतर राज ठाकरेंची जळजळीत पोस्ट.....

मुंबई (प्रतिनिधी) - आयआयटी पवई येथील विद्यार्थी साहिल वाकोडे याने टोकाचे पाऊल टाकले. त्याचा मानसिक छळ केल्याने आणि जातीवाचक शिवीगाळ केल्यानेच त्याने हे टोकाचे पाऊल टाकल्याचा आरोप पालकांसह नातेवाईकांनी केला. प्राध्यापक सूर्यनारायण डुल्ला यांचा आज गुन्हे शाखा जबाब नोंदवणार आहे. त्याचवेळी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एक मोठी पोस्ट लिहित याप्रकरणी काही महत्त्वाचे सवाल उपस्थित केले आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना जाती-पातीच्या राजकारणात न गुरफटण्याचे आवाहन केले आहे.



हे साप्ताहिक मालक,मुद्रक,प्रकाशक,डॉ.राजकुमार मा.कोल्हे यांनी जागृती प्रिंटींग प्रेस,बी-१०१,भायखळा सर्विस इंडस्ट्रीयल इस्टेट,डी.के.क्रॉस रोड,भायखळा,मुंबई-४०००२७.येथे छापून ५०१,गोपी मॉल रेसिडेन्स,एनएसएस रोड,डोंबिवली (प.),ठाणे,महाराष्ट्र - ४२१२०२.येथुन प्रकाशित केले.संपादक : डॉ.सौ.प्रेरणा राजकुमार कोल्हे,
भ्रमणध्वनी :८४५२००५१९८/९२२१४३७४१४ ईमेल : RNI No.: MHMAR/26/A2042

Printed, Published And Owned By. Dr. Rajkumar M. Kolhe, Printed At Jagruti Printg Press, B-101, Byculla Service Industrial Estate, D. K. Cross Road, Byculla, Mumbai - 400027, and Published From 501, Gopi Cine Mall Residence, NSS Road, Dombivli West, Thane, Maharashtra.- 421202
Editor : Dr.Mrs.Prerna R.Kolhe, Mobile : 8452005198,Email :www.mahavidyalaykhabarbat.in, RNI No.:- MHMAR/26/A2042